## नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०११ मधील
## निशाण क्र. १३७ खालील आदेश
## (**CNR No.– MHRT**050004592011)

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी मयत प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणेकरीता व त्याप्रमाणे प्रतिदाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे ह्या दि.१६/०७/२०१७ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना ७अ. श्री. मधुकर धोंडू पंडे (मयत मुलगा) प्रतिवादी क्र. ७ अ१ सुनंदा मधुकर पंडे, प्रतिवादी क्र. ७ अ२ दिनेश मधुकर पंडे, प्रतिवादी क्र. ७ अ३ निलेश मधुकर पंडे, प्रतिवादी क्र. ७ अ४ नितेश मधुकर पंडे, प्रतिवादी क्र. ७ब श्री. अनंत धोंडू पंडे (मुलगा), प्रतिवादी क्र. ७ क कृष्णा धोंडू पंडे (मुलगा) व प्रतिवादी क्र. ७ड कविता कृष्णा पाटेकर (मुलगी) हे सरळ व कायदेशीर प्रतिनिधी आहेत, यांचे व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही कायदेशीर प्रतिनिधी नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ यांच्या वारसांना प्रस्तुतचे दाव्यात सामील करून त्यांच्याविरूध्द दावा चालविण्याचा हक्क प्रतिवादी क्र. १ यांना आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ७ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे आवश्यक आहे अन्यथा प्रतिवादी क्र. १ यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ यांचे अर्जात नमुद केल्याप्रमाणे कायदेशीर प्रतिनिधी घेऊन त्याप्रमाणे दुरूस्ती करणेची मागणी प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास कायदेशीर प्रतिनिधी यांनी म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्र. ७ यांचे वारसांची नावे व तेच वारस असल्याचे म्हटले आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे सन्मानिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, प्रकरणाचा अभिलेख पाहिला.

५. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीत उभा केलेला वाडा पाडून त्याचा खुला व मोकळा कब्जा, वादी यांना देण्याकरीता आदेशात्मक ताकीदीचा व प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीमध्ये

कोणतेही बांधकाम करु नये असा निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. १ याने नि.२६ कडे प्रतिदावा मिळकतीतील वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी केलेल्या अतिक्रमीत भागातील बांधकाम तोडून त्याखालील जागा खुली करुन देण्याबाबत आदेश मिळण्यासाठी प्रतिदावा दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रकरणातील प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे ह्या दि.१६/०७/२०१७ रोजी मयत झालेची बाब यातील वादी यांनी नाकारलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे अर्जाचे पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच अर्जासोबत प्रतिवादी क्र. ७ पार्वती यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.७ ह्या दि. १६/०७/२०१७ रोजी मयत झाल्या असल्याने मुदतीच्या कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना ९० दिवसांचे आत प्रतिदाव्याच्या अभिलेखावर प्रतिवादी क्र.१ तर्फे घेणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र. १ यांना प्रतिवादी क्र. ७ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ केला आहे.

**६.** प्रतिदाव्याचे स्वरूप व त्यामधील प्रतिवादी क्र.१ यांची मागणी पाहता सदर वादविषयाला घेवून भविष्यात वादी, प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधींचे दरम्यान अनेक दावे दाखल होऊ शकतात. प्रतिवादी क्र.१ यांची प्रतिदाव्यातील मागणी पाहता प्रतिवादी क्र. ७ पश्चात सदर दावा चालविणेचा अधिकार त्याचे कायदेशीर प्रतिनिधींना प्राप्त होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ७ यांचे कायदेशीर प्रतिनिधींना प्रतिदाव्याचे अभिलेखावर घेतल्याने वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रस्तुत प्रतिदाव्यातील वादविषयाचे नैसर्गीक निर्गतीकरिता प्रतिवादी क्र. ७ चे कायदेशीर प्रतिनिधींची याकामी उपस्थिती आवश्यक असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. ७ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणेस प्रतिवादी क्र.१ यांना परवानगी दिल्यास नैसर्गिक न्यायादानास मदतच होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र. ७ चे कायदेशीर प्रतिनिधींना या कामी अभिलेखावर घेणेस परवानगी देवून तशी दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. याकारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज (नि. १३७) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांना मयत प्रतिवादी क्र. ७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे कायदेशीर प्रतिनिधींना प्रतिदाव्याचे अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी मयत प्रतिवादी क्र. ७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेऊन तशी दुरूस्ती प्रतिदाव्यात करुन प्रतिदाव्याची दुरुस्त प्रत सदर प्रकरणात दाखल करावी तसेच दुरूस्त प्रतिदाव्याची प्रत विरूध्द पक्षास पुरविण्यात यावी.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.03.04 17:44:42 +0530

**दिनांक– ०३/०३/२०२५**

**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

CERTIFICATE

I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. Civil Judge, J.D., Khed. |
| Date of Decision | : | 03/03/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 03/03/2025 |
| Order uploaded on | : | 04/03/2025 |